# राशिभविष्य - नोव्हेंबर, २०२०.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

======================================================================

**सूचना - प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या राशीच्या जन्मनक्षत्रांसाठी त्या त्या जन्मनक्षत्राचा तारक मंत्र दिला आहे. आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे, व्याधी, पीडा, आजार, अन्य समस्या यांचे निवारण होते, असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही तसा प्रयत्न करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आल्यास कृपया आम्हांस कळवावे.**

======================================================================

**(१) मेष -** या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत हर्षल असून तो वक्री असल्यामुळे या राशीच्या मंडळींचा स्वभाव अधिकच चंचल, लहरी, अस्थिर झाला असण्याची शक्यता दिसते. या राशीच्या लहान मुलांच्या खोड्या तर अधिकच वाढल्या असतील. पण हा हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यास अनुकुल असला तरी त्या कार्यात अडचणी, अडथळे येणे संभवते. या राशीच्या धनस्थानी वृषभ राशीत राहू असून त्यामुळे कौटुंबिक जीवनात कलह निर्माण होतील. शिवाय आर्थिक चिंता त्रस्त करतील. या राशीच्या षष्ठ स्थानी कन्या राशीत शुक्र असून तो कलाक्षेत्रातील मंडळींना अनुकुल असला तरी या महिन्याच्या काळात सर्व प्रकरच्या कलावंत मंडळींना उच्च कलागुण असूनही अधिक प्रगती करणे शक्य होणार नाही. तसेच आपल्या कलागुणांचे प्रदर्शन करण्यास संधीच मिळणार नाही. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात हा शुक्र या राशीच्या सप्तम स्थानी तुळा राशीत गेल्यावर ज्यांचे जीवनसाथी कलाकार आहेत त्यांना जीवनसाथीच्या कलेतील कौशल्याचा आनंद घेता येणे शक्य होईल. पण या राशीच्या सप्तम स्थानी रवि -बुध असेपर्यंत या राशीच्या विवाहित मंडळींना पतिपत्नीत होणारे वाद, गैरसमज, अन्य कटकटी यांमुळे सुखसमाधान मिळणार नाही. शिवाय अनारोग्य होणे संभवते. काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील. महिन्याच्या उत्तरार्धात येथील रवि या राशीच्या अष्टम स्थानी वृश्चिक राशीत जाईल. त्या स्थानी केतू आहेच. त्यामुळे हे दोन्ही ग्रह अधिकच प्रतिकुल होतील व त्यामुळे आजार, दु:ख, संततिसुखात बाधा, काही मंडळींना त्वचारोगाचा तर काही मंडळींना रक्तविकाराचा आजार त्रस्त करील. कुटुंबात कलह होतील. वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येईल. या राशीच्या भाग्यस्थानी धनु या स्वराशीत गुरु ग्रह असून त्यामुळे प्रवासयोग येतील, अनुकुल संधी मिळेल. उत्कर्ष होईल, अध्यात्माची आवड असेल तर उपासनेद्वारे त्यात प्रगती होईल. क्वचित कोणास कीर्ती, प्रसिद्धी मिळेल. येथील गुरु महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी मकर राशीत जाईल. त्या स्थानी स्वराशीत शनि ग्रह असल्यामुळे तो लोखंड , कोळसा यांचा व्यापार-व्यवसाय असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात गुरु ग्रहामुळे बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना तसेच वकिली व्यवसाय असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून तो वक्री असल्यामुळे अधिकच प्रतिकुल होईल व त्यामुळे आर्थिक नुकसान होणे संभवते. कुमार्गी मित्रांपासून .त्रास होईल. त्यामुळे गहिरे नैराश्य येईल. या राशीच्या व्यय स्थानी मीन राशीत असलेला मंगळ पूर्णपणे प्रतिकुल असून त्यामुळे आर्थिक चिंता, भांडणे, मानहानी, मानसिक अस्वस्थता यांचा असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज सकाळी स्नान

झाल्यावर “श्रीगणेश अथर्वशीर्षा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी “ओम अश्विनीकुमाराभ्यां नमः:” मंत्राचा, भरणी जन्मनक्षत्र असणारांनी “ ओम यमाय नमः:”मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी “ओम अग्नये नमः” मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ -** या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत राहू असून त्याच्यामुळे सतत मनस्तापदायक घटना घडण्याची शक्यता आहे. अपमान होणेही संभवते. त्यामुळे मनात सूडभावना प्रबळ होईल. शिवाय त्यामुळे अनारोग्य होणेही संभवते. काही मंडळींना वातविकाराचा आजार त्रस्त करील. या राशीच्या पंचम स्थानी कन्या राशीत शुक्र ग्रह असून तो सर्व प्रकारच्या कलाकार मंडळींना अनुकुल असून त्याच्यामुळे सर्व प्रकारे सुखसमाधान लाभेल. या राशीच्या षष्ठ स्थानी तुळा राशीत रवि -बुध असून महिन्याच्या उत्तरार्धात पंचम स्थानी असलेला शुक्र या षष्ठ स्थानी स्वराशीत येत आहे. यातील रवि -बुध या राशीच्या दशम स्थानास पूरक होतील. रवि ग्रह भाग्योदयकारक असून त्याच्यामुळे हितशत्रू पराभूत होतील. मन:शांती लाभेल. बुधामुळे कार्यसिद्धी होईल. धनलाभ होईल. कीर्ती प्रसिद्धी लाभेल. पण शुक्रामुळे या राशीच्या सर्व प्रकारच्या कलाकारांना गुणवत्ता असूनही कलागुण प्रदर्शित करण्यास संधीच मिळणार नाही. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या राशीच्या सप्तम स्थानी वृश्चिक राशीत गेल्यावर अनारोग्यकारक होईल व त्याच्यामुळे काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील. पण केंद्रस्थानी असल्याने भाग्योदयकारक होईल. या सप्तम स्थानी असलेला केतू वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करील. या राशीच्या अष्टम स्थानी धनु या स्वराशीत गुरु ग्रह असून या गुरुमुळे ज्यांच्या अन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने
असा अचानक धनलाभ होईल. या राशीच्या भाग्यस्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी असलेला गुरु भाग्यस्थानी येत आहे. येथील शनि ग्रह सर्वसाधारपणे शुभ असून त्याच्यामुळे काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील. महिन्याच्या उत्तरार्धात गुरु ग्रह भाग्यस्थानी असल्यामुळे बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून तो नोकरी-व्यवसायात अस्थिर परिस्थिती निर्माण करील. पण मनोवैज्ञानिक व द्रव पदार्थांचे व्यापारी यांना अनुकुल असला तरी वक्री असल्याने अडचणी, अडथळे येण्याची शक्यता आहे. या राशीच्या लाभस्थानी मीन राशीत मंगळ असून त्याच्यामुळे कष्ट परिश्रम करणारांनाच अर्थप्राप्ती होईल. काही मंडळींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होईल. पण तो मैत्रीत वितुष्ट निर्माण करण्याची शक्यता आहे. या राशीच्या व्ययस्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे सांपत्तिक अडचणी, शत्रुत्व, जिवावरचे प्रसंग, बेअब्रूचे प्रसंग अशापैकी मनस्तापदायक घटना सहन कराव्या लागन्यायाची शक्यता आहे. जपा. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “श्रीशिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी “ओम अग्नये नमः:” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी “ओम ब्रह्माय नमः” मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ओम सोमसोमाय नमः: “ मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या चतुर्थ स्थानी कन्या राशीत शुक्र असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी तुळा या स्वराशीत जात आहे. त्यामुळे या महिन्याचा पूर्वार्ध कौटुंबिक सुखाचे दृष्टीने अनुकुल होईल. शेतीवाडी असणारांना त्यापासून लाभ होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात सर्व प्रकारच्या कलाकार मंडळींना आपल्या कलेतील प्रगतीबद्दल समाधान प्राप्त होईल. या राशीच्या पंचम स्थानी रवि -बुध आहेतच. पैकी येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी वृश्चिक राशीत जात आहे. त्यामुळे हे रवि -बुध महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होतील व त्यामुळे अनारोग्य, संततिसुखात बाधा, नोकरीत वरिष्ठांचा त्रास, अस्वस्थ मनस्थिती, प्रिय जनांपासून होणारा दुरावा अशापैकी कारणानी असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी असलेले रवि -केतु हे दोन्ही ग्रह अनुकुल होतील व त्यामुळे हितशत्रूंचा त्रास नाहीसा होईल, मन:शांती लाभेल. हा रवि दशम या नोकरी-व्यवसायाच्या स्थानास पूरक होईल. केतुमुळे आरोग्य सुधारेल व सुखसमाधान लाभेल. या राशीच्या सप्तम स्थानी धनु या स्वराशीत गुरु ग्रह आहे. तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी मकर राशीत जात आहे. येथे मकर या स्वराशीत शनि ग्रह आहेच. गुरु ग्रहामुळे काही मंडळींचे प्रेमसंबंध जुळून येतील, काहींना विवाहयोग येईल, नवे स्नेहसंबंध जुळून येतील, प्रवासयोग संभवतो. शिवाय हा गुरु ग्रह या राशीच्या अष्टम स्थानी गेल्यावर ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने असा धनलाभ होईल. पण शनीमुळे अपेक्षाभंग होणे, मोठे अनारोग्य होणे, अशापैकी कारणांनी मनस्थिती अशांत राहील. या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असल्यामुळे ज्यांना अध्यात्मात मनापासून रस आहे अशाना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील, तर काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. पण हा नेपच्यून वक्री असल्यामुळे अडचणी, अडथळे येणे संभवते. या राशीच्या दशम स्थानी मीन राशीत मंगळ असल्यामुळे नोकरीत कामाचा ताण व वरिष्ठांचा जाच सहन करावा लागेल. स्वतंत्र व्यापार-व्यवसाय असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडतील. पण औषध विक्रेते आणि यांत्रिकतांत्रिक व्यवसाय असणारांना हा मंगळ काही प्रमाणात अनुकुल होईल. या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून सर्व काही अनिश्चित असेल, मित्राशी भांडणे होतील, पण काही मंडळींना अर्थलाभ होणेही संभवते. या राशीच्या व्ययस्थानी वृषभ राशीत राहू असून तो अनुकुल होईल व काही मंडाळींना पर-देशगमनाची संधी मिळेल. हितशत्रूंपासून रक्षण होईल; पण वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर कुलदैवताची व श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर कुलदैवताच्या नावाचे स्तोत्र पठण करा तसेच “बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्याचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ ओम सोम सोमाय नमः:” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी “ओम शंकराय नमः:” मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी “ओम आदितीये नमः:” मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -** या राशीच्या तृतीय स्थानी कन्या राशीत असलेला शुक्र अनुकुल असून लाभदायक आहे. त्याच्यामुळे काही मंडळींना भूमिलाभ, काही मंडळींना प्रतिष्ठा तर काहींना धनलाभ होणेही शक्य आहे. पण हा शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी तुळा राशीत गेल्यावर

काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. कारण या राशीच्या चतुर्थ स्थानी तुळा राशीत प्रथमपासून रवि -बुध आहेतच. पैकी रवि ग्रह प्रतिकुल असून त्याच्यामुळे कौटुबिक जीवनातील सुखात विविध कारणांनी बाधा येण्याची शक्यता आहे. बुधामुळे धननाश होणे संभवनीय असले तरी तो काही प्रमाणात गृहसौख्य व मित्रसुख देऊ शकेल. या राशीच्या पंचम स्थानी वृश्चिक राशीत केतू
असून महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह पंचम स्थानी येत आहे. त्यामुळे हे दोन्ही ग्रह प्रतिकुल होतील व त्यांच्यामुळे अनारोग्य, अपघात, संततीपैकी कोणाचे आजार, नोकरीत वरिष्ठांचा त्रास, नातेसंबंधात येणारा दुरावा, अस्वस्थ मनस्थिती अशापैकी कारणांनी बेचैन होण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी धनु या स्वराशीत गुरु ग्रह असल्यामुळे तो आरोग्यदायक होईल. काही मंडळींना नोकरचाकरांचे सुख मिळेल. महिन्याच्या उत्तरार्धात हा गुरु या राशीच्या सप्तम स्थानी मकर राशीत जात आहे. त्या स्थानी शनि ग्रह आहेच. हा शनि प्रत्येक गोष्टीत विलंब. अडचणी, अडथळे निर्माण करण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रेमसंबंध असणारांनी त्यात बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच प्रवासयोग असला तरी त्यात काहीही कारणाने अडथळे येणे संभवते. तसेच आर्थिकलाभ होण्यातही विलंब होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून तो आधीच प्रतिकुल आहे. त्यात भर म्हणून तो वक्री असल्याने अधिकच प्रतिकुल होण्याची शक्यता आहे. हा नेपच्यून जलभयकारक व विषभयकारक असल्याने शक्यतो जलप्रवास करू नका. खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका, बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या भाग्यस्थानी मीन राशीत मंगळ असून त्याच्यामुळे प्रवासात त्रास, मानहानी होणे संभवते. या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यास अनुकुल असला तरी वक्री असल्यामुळे सहजासहजी नियोजित कार्यात प्रगती होणे संभवत नाही. या राशीच्या लाभस्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे संततिविषयक एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. तसेच जुगाराचा नाद असलेल्यांनी मनावर ताबा ठेवून त्यापासून दूर राहावे. ज्यांच्या हाती अधिकार आहे त्यांनी वाममार्ग धन मिळविण्याचा विचारही करू नये. तेच सुखाचे होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी " ओम आदितीये नमः " मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी "ओम बृहस्पतये नमः" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी " ओम सर्पाय नमः:" मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या धनस्थानी कन्या राशीत शुक्र असून त्याच्यामुळे वैवाहिक व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. हा शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी तुळा या स्वराशीत
जात आहे. त्या स्थानी रवि -बुध आहेतच. या रवि-बुधापैकी बुध प्रतिकुल असून रवि व शुक्र दोन्हीही
अनुकुल व लाभदायक होतील. हा रवि सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना अनुकुल असून त्याच्यामुळे सुखसमाधान लाभेल. तुमच्या कामाचा वरिष्ठांवर प्रभाव पडेल. त्यामुळे काही मंडळींना बढती मिळेल, तर काही मंडळींचा सन्मान होईल. क्वचित कोणास उच्च पद मिळणेही संभवते. आरोग्य उत्तम राहील. शुक्रामुळे काही मंडळींना भूमिलाभ होईल. या राशीच्या चतुर्थ

स्थानी वृश्चिक राशीत केतू असून महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या राशीच्या चतुर्थ स्थानी वृश्चिक राशीत येत आहे. हे दोन्ही ग्रह प्रतिकुल होणार असून त्यामुळे अनारोग्य, कार्यदिरंगाई, कौटुंबिक त्रास, दु:ख सहन करावे लागेल. केतूमुळे विषभयही आहे. जपा. या राशीच्या पंचम स्थानी धनु या स्वराशीत गुरु ग्रह असून त्याच्यामुळे सर्व सुख लाभेल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. अर्थलाभ होईल. प्रेमसंबंध असतील तर त्यात वाढ होईल. येथील गुरु महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी मकर राशीत जात आहे. त्या स्थानी शनि ग्रहही आहेच. हा शनि ग्रह शत्रुत्व निर्माण करील, अनारोग्याचा त्रास होईल, गैरसमजुती, भांडणे होतील. पण हा शनि दशम स्थानास पूरक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात गुरु ग्रहामुळे परिस्थिती सुधारेल व आरोग्य सुधारेल व सुखसमाधान लाभेल. या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी मीन राशीत मंगळ असून त्यामुळे शारीरिक उष्णता विकाराचे आजार होणे संभवते. विशेष करून मूळव्याधीसारखा आजार त्रस्त करील. हाडमोड होणेही संभवते. त्याशिवाय पाण्यापासून व विजेपासून धोका आहे. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून तो शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल असला तरी तो वक्री असल्यामुळे प्रगतीत अडथळे, अडचणी येणे संभवते. काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीगायत्री देवीची उपासना अनुकुल होईल. दररोज स्नान झाल्यावर गायत्रीमंत्राचा बारा वेळा जप करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी “ओम पितराय नमः”: मंत्राचा, जन्मनक्षत्र पूर्वा असणारांनी “ओम भगाय नमः: “ मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ओम आर्यमे नमः: “ मंत्राचा श्रद्धेने मनापासून १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या -** या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत शुक्र असून त्याच्यामुळे वैवाहिक सुखसमाधान लाभेल. या राशीच्या धनस्थानी तुळा राशीत रवि -बुध आहेत. महिन्याच्या उत्तरार्धात प्रथम स्थानी असलेला शुक्र या राशीच्या धनस्थानी येत आहे. येथील रवि -बुध प्रतिकल असून त्यांच्यामुळे डोळ्याचे अनारोग्य, वित्त हानी, भांडणे , मित्रद्रोह होणे, कुसंगतीचा त्रास होणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात बुध -शुक्रामुळे धनलाभ, कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. महिन्याच्या उत्तरार्धात धनस्थानी असलेला रवि या राशीच्या तृतीय स्थानी वृश्चिक राशीत जात आहे. तेथे केतू आहेच. या केतूमुळे मानसिक दु:ख सहन करावे लागेल. पण रवि ग्रह अनुकुल होईल व त्याच्यामुळे या राशीच्या नोकरदार मंडळींना नोकरीत विविध प्रकारचे लाभ होणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी धनु या स्वराशीत गुरु ग्रह असून या गुरुमुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. ज्यांचे स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार असतील तर ते यशस्वीपणे पार पडतील. पण नातेसंबंधातील कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यता आहे. हा गुरु महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी मकर राशीत जात आहे. या पंचम स्थानी स्वराशीत शनि आहेच. त्यामुळे पूर्वार्धात या शनि मुळे स्वभाव स्वार्थी, संशयी बनेल. महिन्याच्या उत्तरार्धात गुरुची साथ मिळाल्यावर तो बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनकुल होईल. या राशीच्या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे काही मंडळींना फसवणुकीचा त्रास सहन करावा लागेल. काही मंडळींना उगीचच एखादी आजारभावना किंवा काल्पनिक चिंता त्रस्त करील. या राशीच्या सप्तम स्थानी मीन राशीत मंगळ असून त्याच्यामुळे काहीही कारणाने वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करील. ज्यांचा भागीदारीत व्यापारव्यवसाय

आहे त्यांनी वाद, मतभेद, संशय अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून तो अपघातभयकारक आहे. त्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा. या राशीच्या भाग्यस्थानी वृषभ राशीत राहू आहे. त्याच्यामुळे प्रवासाचे योग येतील. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज स्नान झाल्यावर श्रीगणेश अथर्वशीर्षा"चे पठण करा.तसेच १२ वेळा "ओम गं गणपतये नमः:" मंत्राचा जप करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी " ओम आर्यमे नमः " मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी "ओम सूर्याय नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नमः: " मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा -** या राशीच्या व्ययस्थानी कन्या राशीत शुक्र ग्रह असून त्याच्यामुळे क्षणिक सुखसमाधान लाभेल. पण तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम स्थानी स्वराशीत प्रवेश करील तेव्हाही वैवाहिक सुख मिळेल. या राशीच्या प्रथम स्थानी रवि -बुध आहेतच. पण हे दोघेही प्रतिकुल असून त्यांच्यामुळे अनारोग्य, मनस्ताप, चिंता, धननाश, मित्रद्रोह, कुसंगतीची बाधा होणे संभवते. तसेच मनस्थिती अस्वस्थ, चंचल राहील. महिन्याच्या उत्तरार्धात येथील रवि या राशीच्या धनस्थानी वृश्चिक राशीत गेल्यावरही आर्थिक चिंता त्रस्त करतील. काही मंडळींना डोळ्याचे अनारोग्य त्रस्त करील. कुटुंबात वाद, भांडणे होतील. धनस्थानी असलेला केतूही प्रतिकुलच होईल. या राशीच्या तृतीय स्थानी धनु या स्वराशीत गुरु ग्रह असून तो बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना व या राशीच्या लेखकवर्गाला अनुकुल होईल व काही मंडळींचे लेखन ग्रंथरूपाने प्रकाशित होईल. काही मंडळींना प्रवासयोग येईल. पण एखाद्या भावंडाकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात हा गुरु या राशीच्या चतुर्थ स्थानी मकर राशीत जाईल. या स्थानी शनि ग्रह आहेच. या शनीमुळे गृहसौख्यात बाधा येईल. त्यामुळे नैराश्य येण्याची शक्यता आहे. पण महिन्याच्या उत्तरार्धात गुरु ग्रहामुळे परिस्थितीत सुधारणा होईल व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. ज्यांचे स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार होणार असतील तर ते अपेक्षेनुसार पार पडतील. पण या गुरुमुळे नातेसंबंधातील कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अति भावनाशील होईल; पण तो उपासनेद्वारे आध्यात्मिक उन्नती करू शकेल. तसेच गूढ संशोधनासही तो अनुकुल होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी मीन राशीत मंगळ असून त्याच्यामुळे उष्णताविकाराचे आजार होणे संभवते. ताप येणे, फोड येणे, इजा होणे अशापैकी आजार होण्याची शक्यता आहे. काही मंडळींना रक्तविकाराचा आजार तर काहींना हृदयविकार होणेही संभवते. जपा. त्याशिवाय चोरी होणे, अर्थहानी होणे संभवते. काही मंडळींना अपप्रचाराचा मनस्ताप सहन करावा लागेल. पण हा मंगळ औषधीशास्त्रातील संशोधनास अनुकुल होईल. या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात विविध कारणांनी बाधा येण्याची शक्यता आहे. ज्यांचा भागीदारीत व्यापार व्यवसाय आहे त्यांनी गैरसमज, वाद, संशय अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या राशीच्या अष्टम स्थानी वृषभ राशीत असलेला राहू अनुकुल असून दीर्घायुष्यदायक होईल. शिवाय त्याच्यामुळे काही मंडळींना अचानक धनलाभ होणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नमः:" मंत्राचा, ज्यांचे

जन्मनक्षत्र स्वाती आहे त्यांनी “ओम वायवे नमः:” मंत्राचा, आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी “ओम इंद्राग्नये नमः:” मंत्राचा श्रद्धेने मनापासून १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या व्ययस्थानी तुळा राशीत रवि -बुध असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत येत आहे. तेथे केतु आहेच. शिवाय लाभस्थानी असलेला शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी जात आहे. त्यामुळे या संपूर्ण महिन्याच्या काळात रवि -बुध हे दोन्ही ग्रह प्रतिकुल असणार आहेत. त्याचा परिणाम म्हणून मनस्ताप, चिंता, मानहानी, शारीरिक-मानसिक अनारोग्य होणे संभवते. त्यामुळे गहिरे नैराश्य येणेही शक्य आहे. बुधामुळे मित्रद्रोह व काही मंडळींना कुसंगतीची बाधा होणे संभवते. त्यामुळे धननाश होणेही शक्य आहे. जपा. पण या संपूर्ण महिन्याच्या काळात शुक्र ग्रह अनुकुल होईल आणि त्याच्यामुळे धनलाभ होईल व मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या प्रथम स्थानी असलेला केतूही अनुकुल होईल; पण त्याच्यापासून वाहनधोका आहे. जपा. या राशीच्या धनस्थानी धनु या स्वराशीत गुरु ग्रह असून त्याच्यामुळे कुटुंबात शुभ घटना घडतील , व्यावसायिकांच्या व्यवसायात वाढ होईल. उत्तम अर्थलाभ होईल. येथील गुरु महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी मकर राशीत जात आहे. या स्थानी स्वराशीत शनि ग्रह आहेच. येथील शनीमुळे काही मंडळींना नवी नोकरी मिळेल’; तर काहींना आवडते नवे कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करील. तृतीय स्थानी आलेल्या गुरु ग्रहामुळेही भावंडांपैकी कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाणे संभवते. पण काही मंडळींना प्रवासाचे योग येतील. या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपात प्रकाशित होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे घरगुती परिस्थितीत घोटाळे, गैरसमज अशापैकी कारणांनी अशांत परिस्थिती निर्माण होईल. या राशीच्या पंचम स्थानी मीन राशीत मंगळ असून त्याच्यामुळे अनारोग्य होणे, स्थावरसंबंधी त्रास होणे संभवते.

संततीपैकी कोणाकडून तरी मनस्तापदायक आचरण होणे अशापैकी कारणांनी अस्वस्थ व्हाल. पण वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना हा मंगळ प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे अनारोग्य होणे संभवते. मनस्थिती चंचल, अस्वस्थ राहील. काही मंडळींना मुदतीचा ताप येणेही संभवते. हा हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यास पूरक असला तरी अशा कार्यक्षेत्रातील मंडळींनी सतत अति खोल विचारात मग्न राहू नये. नपेक्षा डोकेदुखीचा किंवा मेंदूविकाराचा आजार त्रस्त करील. या राशीच्या सप्तम स्थानी वृषभ राशीत राहू असून या राहूमुळे या राशीच्या काही मंडळींच्या मनात कपटी विचार येतील. काही मंडळींना वाममार्ग धन मिळविण्याची प्रबळ इच्छा बेचैन करील. तसेच हा राहू वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करील. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “श्रीगणेश अथर्वशीर्षा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी “ओम इंद्राग्नये नमः:” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा आहे त्यांनी “ ओम मित्राय नमः:” मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी “ओम इंद्राय नम: “ मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु -** या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत गुरु ग्रह असून तो बौद्धिक व संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. त्याच्यामुळे आरोग्यही उत्तम राहील. हा गुरु महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी मकर राशीत जात आहे. तेथे स्वराशीत शनि आहेच. या शनीमुळे कौटुंबिक जीवनात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता आहे. शिवाय आर्थिक संकटेही त्रस्त करतील. पण महिन्याच्या उत्तरार्धात गुरु ग्रह धनस्थानी गेल्यावर परिस्थिती सुधारेल. कुटुंबात मनोनुकुल घटना घडतील. अर्थलाभ होईल. व्यावसायिकांच्या व्यवसायात वाढ होईल. मन:शांती लाभेल. या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती भावनाशील होईल. पण व्ययस्थानी असलेल्या केतूमुळे स्वभाव लहरी होईल. हा नेपच्यून
अध्यात्म व गूढ संशोधन कार्यास अनुकुल होईल. पण तो वक्री असल्यामुळे जलप्रवासात किंवा
परदेशात जातेवेळी अडचणी, अडथळे सहन करावे लागण्याची शक्यता आहे. या राशीच्या चतुर्थ स्थानी मीन राशीत मंगळ असून त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनात कटकटी, भांडणे, गैरसमज, असमाधानकारक घटना अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे उच्च बौद्धिक कार्यात कार्यरत असणारांना अडचणी अडथळे सहन करतच प्रगती करावी लागेल. या वृश्चिक राशीत राशीच्या षष्ठ स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे स्वभाव धूर्त व कावेबाज होणे संभवते. तसेच तो विषभयकारक असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील. पण त्याच्यामुळे शत्रूवर विजय मिळेल. तसेच ज्यांचा अन्य जातिधर्माच्या लोकांशी व्यावसायिक संबंध आहे अशा मंडळींना अशा संबंधामुळे आर्थिक लाभ होतील. या राशीच्या दशम स्थानी असलेल्या शुक्रामुळे स्वतंत्र व्यावसायिकांच्या व्यवसायात अडचणी, अडथळे निर्माण होणे संभवते, महिन्याच्या उत्तरार्धात हा शुक्र या राशीच्या लाभस्थानी तुळा राशीत जात आहे. या लाभस्थानी तुळा राशीत रवि -बुध आहेतच. हे तिन्ही ग्रह अनुकुल असल्याने या राशीच्या सर्वांना विविध प्रकारे लाभदायक होतील. पण महिन्याच्या उत्तरार्धात येथील रवि या राशीच्या व्ययस्थानी वृश्चिक राशीत गेल्यावर प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे मनस्थिती अस्वस्थ राहील. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी " ओम निॠतये नमः मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी "ओम उदकाय नमः" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी " ओम विश्वेदेवाय नमः:" मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या व्ययस्थानी धनु या स्वराशीत गुरु ग्रह असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम स्थानी जात आहे. तेथे स्वराशीत शनि ग्रह आहेच. हा गुरु ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात अध्यात्मात रस असणारांना आणि सामाजिक कार्याची आवड असणारांना अनुकुल होईल. पण या राशीच्या प्रथम स्थानी असलेला शनि अनारोग्यकारक व कौटुंबिक सुखात बाधा आणणारा आहे. नियोजित कार्यात अडचणी येतील. कुटुंबातील प्रिय जनांपासून दूरत्व येणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात गुरु ग्रह प्रथम स्थानी आल्यावर परिस्थितीत बदल होईल.

आरोग्य सुधारेल. बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे आर्थिक समस्या त्रस्त करतील. या राशीच्या तृतीय स्थानी मीन राशीत मंगळ असून तो शुभ असून त्याच्यामुळे धैर्य, हिंमत, महत्त्वाकांक्षा, कर्तबगारी वाढेल . प्रवासाचे योग येतील; पण त्याच्यामुळे इजा होणे संभवते. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही. कोणाशी पटणार नाही. सतत तक्रारी करत राहाल. वास्तुसुख लाभणार नाही. या राशीच्या पंचम स्थानी वृषभ राशीत राहू असून

या राहूमुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. पण हा राहू दलाली, कमिशनवर व्यवसाय करत असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या भाग्यस्थानी कन्या राशीत शुक्र असून हा शुक्र अनुकुल व सुखकारक होईल. काही मंडळींना गुरुकृपा प्राप्त होईल तर काहींना थोरकृपा प्राप्त होईल. काही भाग्यवान मंडळींना कीर्ती, प्रसिद्धी प्राप्त होईल. येथील शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी तुळा

या स्वराशीत जात आहे. त्या स्थानी रवि -बुधही आहेतच. हे रवि -बुध या संपूर्ण महिन्याच्या काळात अनुकुल होणार असून त्याच्यामुळे मानसिक, कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. धनवृद्धी होईल. इच्छाआकांक्षा पूर्ण होतील. मोठ्या ओळखी होतील. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या नोकरदार मंडळींना बढती , पगारवाढ, काही मंडळींचा सन्मान होईल, तर क्वचित कोणास उच्च पद मिळणेही शक्य आहे. व्यावसायिकांच्या व्यवसायात वाढ होईल. लाभस्थानी असलेल्या केतूमुळे

प्रवासयोग येईल. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी “ “ओम विश्वेदेवाय नमः:” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी “ओम विष्णवे नमः” मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ओम वसवे नमः: “ मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे या राशीच्या मंडळींची मनस्थिती अतिशय कोमल झाली असावी, असे वाटते. त्यामुळे मानसिक संवेदनाही अति जलद होत असतील व तो वक्री असल्यामुळे गहिरे नैराश्य येत असावे असे वाटते. या राशीच्या धनस्थानी मीन राशीत मंगळ असल्यामुळे या राशीच्या काही मंडळींना उष्णताविकाराचा आजार त्रस्त करील. त्याशिवाय आर्थिक समस्याही त्रस्त करतील. काही मंडळींना

अनपेक्षितपणे येणाऱ्या आर्थिक जबाबदाऱ्या कशा पार पाडावयाच्या याची चिंता त्रस्त करील. या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून तो उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल असला तरी तो वक्री असल्यामुळे अडचणी, अडथळे सहन करूनच अपेक्षित प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी वृषभ राशीत राहू असून तो कौटुंबिक सुखाचे दृष्टीने प्रतिकुल असून त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनात वाद, गैरसमज, अन्य कटकटी निर्माण होतील व त्यामुळे असह्य मनस्ताप

सहन करावा लागेल. या राशीच्या अष्टम स्थानी कन्या राशीत शुक्र असून त्याच्यामुळे काही मंडळींना कमी श्रमात अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होईल. काही मंडळींना अचानक धनलाभ होईल. काही मंडळींना वारसा हक्काने धनलाभ होईल. या राशीच्या भाग्यस्थानी तुळा राशीत रवि-बुध असे दोन ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी असलेला शुक्र या राशीच्या भाग्यस्थानी तुळा राशीत जात आहे. येथील रवि-बुध प्रतिकुल असल्यामुळे अपेक्षाभंग होणे, मानहानी, विरोध होणे, भांडणे होणे, कामात दिरंगाई होणे संभवते. पण शुक्रामुळे मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या दशम स्थानी वृश्चिक राशीत केतु असून महिन्याच्या उत्तरार्धात भाग्यस्थानी असलेला रवि दशम स्थानी वृश्चिक राशीत येत आहे. हा रवि या राशीच्या नोकरदार मंडळींना अनुकुल व लाभदायक होईल. केतूमुळे काही मंडळींना हातची नोकरी सोडून द्यावी असे वाटेल. पण त्यांनी तो विचार मनातून काढून टाकावा व आहे ती नोकरीच मनापासून करावी. या राशीच्या लाभस्थानी धनु या स्वराशीत गुरु ग्रह असल्यामुळे इच्छाआकांक्षा पूर्ण होतील. वाहनसुख मिळेल. धनलाभ होईल. विवाहेच्छूना विवाहयोग येईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या व्ययस्थानी मकर या स्वराशीत शनि असून तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे आर्थिक चिंता, मानहानी, अनारोग्य होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात गुरु ग्रह व्ययस्थानी गेल्यावर कौटुंबिक त्रास होणे संभवते. पण हा गुरु सामाजिक कार्याची व अध्यात्माची आवड असणारांना अनुकुल होईल. श्रद्धा असेल तर श्रीशिवोपासना व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ओम वसवे नमः:” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी “ओम वरुणाय नमः:” मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अजैकचरणाय नमः:” मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन -** या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत मंगळ असून त्याच्यामुळे या राशीच्या मंडळींचा स्वभाव हट्टी, संतापी, मानापमान फार असणारा, अकारण श्रम, दगदग करून शरीरपीडा देणारा असा झाला असावा असे वाटते. त्यामुळे या राशीच्या नोकरदार मंडळींना नोकरीत मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. या राशीच्या धनस्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे हातून विचित्र आचरण होत असले पाहिजे. अस्थिर विचारशक्ती झाली असल्यास अविचाराने खर्च होणे, आपल्या फटकळ बोलण्याने समोरच्याचा अपमान करणे अशा गोष्टी घडत असल्या पाहिजेत. या राशीच्या तृतीय स्थानी वृषभ राशीत राहू असून तो अनुकुल असून त्याच्यामुळे मनस्थिती हरहुन्नरी होईल व हातून काही कर्तृत्व घडेलसे वाटते. पण या राहूमुळे बंधुसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी कन्या राशीत शुक्र असून त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. ज्यांचे प्रेमसंबंध आहेत त्यांचे विवाह होणे संभवते. येथील शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी स्वतःच्या तुळा राशीत गेल्यावर काही मंडळींना कमी श्रमात अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होईल. जन्मकुंडलीत योग असणारांपैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होईल. काहींना वारसा हक्काने असा अचानक धनलाभ होईल. या राशीच्या अष्टम स्थानी रवि-बुध आहेतच. पैकी बुध ग्रह अनुकुल होईल व त्याच्यामुळे कार्यसिद्धी होईल व सुखसमाधान लाभेल. पण रवि ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल असल्यामुळे अनारोग्य, अपयश, दुःख, संततिसुखात बाधा येणे संभवते. महिन्याच्या

उत्तरार्धात तो या राशीच्या भाग्यस्थानी वृश्चिक राशीत गेल्यावर तेथे असलेल्या केतुमुळे संततिसुखात बाधा येईल. शिवाय ढोंगी आचरण होईल. तसेच रविमुळे मानसिक ताण, मानहानी, विरोध सहन करावा लागेलसे दिसते. या राशीच्या दशम स्थानी धनु या स्वराशीत गुरु ग्रह असल्याने बौद्धिक व संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना तो अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीचा लाभस्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह आहे व तो सर्वसाधारणपणे शुभ असून त्याच्यामुळे अर्थवाढ होईल; पण संततीपैकी कोणास कसला तरी त्रास असल्याने अस्वस्थ व्हाल. महिन्याच्या उत्तरार्धात गुरु ग्रह या राशीच्या लाभस्थानी आल्यावर मनोनुकुल घटना घडतील व सुखसमाधान लाभेल. या राशीच्या व्ययस्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे चिंता, मानसिक व्यग्रता, नैराश्य येणे संभवते. पण हा नेपच्यून गुप्त पोलीस खात्यातील कर्मचाऱ्याना अनुकुल होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अजैकचरणाय नम: “ मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा भाद्रपदा आहे त्यांनी “ ओम अहिर्बुध्न्याय नमः:” मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी “ओम पूषाय नमः:” मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

======ooooo0ooooo=====